**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५३/२०१८**

*CNR No. MHSO060007692018*

संध्या कसबे

*वि.*

मीरा कसबे वगैरे

**निशाणी क्र. ५२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. १ यांनी प्रकरणात झालेला तिचे विरुध्दचा आदेश रद्द करुन तिचे म्हणणे स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे. गैरअर्जदाराचे कथन आहे की, वयस्कर असल्याने आजारपणामुळे ती प्रकरणात हजर होऊ शकलेली नाही. सबब, मुदतीत म्हणणे न मांडल्याने तिचेविरुध्द प्रकरण विना म्हणणे चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. प्रकरणाचे कामकाज गुणवत्तेवर चालण्यासाठी तिला तिचे म्हणणे दाखल करणे असून, तिचे म्हणणे दाखल करण्याची परवानगी न दिल्यास तिचे नुकसान होणार आहे. सबब, झालेला विलंब माफ करुन तिचे विरुध्द झालेला आदेश रद्द करण्यात यावा व तिचे म्हणणे स्वीकारण्यात यावे.

०२. प्रस्तुत प्रकरणात दिनांक १३.०२.२०२० पासून अर्जदाराने या अर्जावर तिचे म्हणणे मांडलेले नाही. दिनांक १९.०३.२०२० पासून प्रकरणात दोन्ही बाजुचे पक्षकार तसेच विधीज्ञ हजर न झाल्याने प्रकरण प्रलंबित आहे. सबब, अर्जदारास या अर्जावर तिचे म्हणणे दाखल करावयाचे नाही हे स्पष्ट होते. सबब, सदरील अर्ज अर्जदाराच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येत आहे.

०३. गैरअर्जदाराचे म्हणणे विचारात घेतले. प्रस्तुतचे प्रकरण हे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल असून, मयत नवनाथ याची गैरअर्जदार क्र. १ ही पत्नी असल्याचे कथन अर्जदाराने केलेले आहे. सदरील बाब पहाता, गैरअर्जदार क्र. १ हिस तिचे म्हणणे दाखल करण्याची परवानगी देणे योग्य होईल. अर्जदार ही हजर रहात नसल्याने उपरोक्त

परिच्छेदातील विवेचन पहाता खर्च लादण्याची आवश्यकता दिसत नाही. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ चे म्हणणे नाही हा आदेश रद्द करण्यात येऊन गैरअर्जदार क्र. १ चे म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

३. खुल्या न्यायालयात घोषित.

स्वाक्षरी/–

दि. २५.०१.२०२४

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 25/01/2024 |
| Order uploaded on | : | 25/01/2024 |